महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक १४७७(२)/२०२२/वीस** **दिनांक : २७ सप्टेंबर, २०२४**

# प्रसिध्दीपत्रक

विषय :- राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०२२
सुधारित तात्पुरती निवड यादी प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- १) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २० मार्च, २०२४ रोजीचे प्रसिध्दीपत्रक
२) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ५ एप्रिल, २०२४ रोजीचे प्रसिध्दीपत्रक
३) मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाचे मूळ अर्ज क्रमांक ३८३/२०२४, ४९३/२०२४, ५६३/२०२४, ५६४/२०२४, ४८३/२०२४, ५३७/२०२४ व ९३७/२०२४ वरील आदेश

राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०२२ या परीक्षेच्या पदनिहाय तात्पुरत्या निवड याद्या आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक २० मार्च, २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आल्या होत्या व त्याआधारे उमेदवारांकडून भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा मार्ग बाबत (Opting Out) विकल्प मागविण्यात आले होते. त्याअनुषंगाने, अंतिम निकाल प्रसिध्द करण्याची कार्यवाही करण्यात येत होती. या दरम्यान काही खेळाडू उमेदवार, दिव्यांग उमेदवार व महिला आरक्षण यासंदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात मूळ अर्ज दाखल झाले होते. त्यावरील महिला आरक्षणासंदर्भातील मूळ अर्जांवर ‘‘The Respondents to consider their candidature and prepare and revise the Provisional Select List and thereafter the Recruitment process to continue.’ असे आदेश झाले आहेत. सदर आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे आयोगाकडून स्टॅम्प नं. २७१२१/२०२४, २७१२३/२०२४ व २७२४९/२०२४ नुसार अपील दाखल करण्यात आले आहे. सदर अपीलावरील निर्णयाच्या अधीन राहून सुधारित तात्पुरती निवड यादी जाहीर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत परीक्षेची सदर सुधारित तात्पुरती निवड यादी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची आहे. अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूर्वी प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणी करताना काही उमेदवारांच्या दाव्यांमध्ये बदल होऊ शकतो व पर्यायाने उमेदवारांचा गुणवत्ता क्रम बदलू शकतो. तसेच शिफारशीचे पदही बदलू शकते.

३. प्रस्तुत सुधारित तात्पुरती निवड यादी विविध मा. न्यायालयात / मा. न्यायधिकरणात दाखल करण्यात आलेल्या दिव्यांगत्व पात्रते संदर्भात दाखल झालेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात येत आहे.

ठिकाण :- नवी मुंबई

उपसचिव, राजपत्रित परीक्षा
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.